# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार

सर्व शिक्षा अभियान

सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 490/शि.वि./सशिअ. दिनांक – 25/02/2015

प्रति,

सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका
प्राथमिक/उच्च प्राथमिक/माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय :– शाळा व्यवस्थापन समिती बॅंक खात्यातील शिल्लक अनुदानाबाबत.**

**संदर्भ :– 1) जा.क्र. मप्राशिप./लेखा 2/सीपीएमएस/शिल्लक पडताळणी/2013–14/277, दि. 06 फेब्रुवारी, 2015.**
**2) पत्र क्र. 476/शि.वि./सशिअ, दि. 10/02/2015**

केंद्र शासनाच्या योजनेनूसार इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम सन 2002 पासून राबविण्यात येत आहे. सन 2014–15 च्या यूडायस माहितीनूसार नागपूर महानगरपालिकेच्या 194 शाळा असून, सर्व शाळामध्ये शाळा व्यवस्थापन समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या शाळांसाठी, सर्व शिक्षा योजनेअतंर्गत राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळया उदि्ष्टांकरीता केंद्र व राज्य सरकारकडून प्राप्त होणाऱ्या निधीचे वितरण महानगरपालिकास्तरावरून करण्यात येते.

शाळा व्यवस्थापन समितीच्या बॅंक खात्याचा तपशिल पाहता रू. 1,07,54,231/– (अक्षरी एक कोटी सात लक्ष चौपन्न हजार दोनशे एकत्तीस रूपये फक्त) अखर्चित दिसून येते. याअर्थी, विद्यार्थ्यांच्या उदि्ष्टपुर्ती करीता शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य सचिव तथा मुख्याध्यापक दुर्लक्ष करीत आहे, असे लक्षात येते.

महाराष्ट्र राज्याचे मंत्री महोदय, व सचिव महोदय, शालेय शिक्षण विभाग यांचे बैठकीत सदरचा मुद्दा विचारात घेण्यात आला. त्याबाबत मंत्री महोदयांनी नाराजी व्यक्त केलेली असून शाळा समितीच्या खात्यावर शिल्लक असलेल्या अनुदानाचा विनियोग दि. 31 मार्च 2015 पर्यंत 100% पूर्ण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने कार्यालयीन आदेशातील मार्गदर्शक सूचना प्रमाणे अखर्चित असलेल्या विविध उपक्रमावरील अनुदान विनियोगात आणावा व खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र दि. 05 एप्रिल 2015 रोजी संबंधित शहर साधन केंद्राकडे (URC) विना विलंब सादर करावा. शहर साधन केंद्राने उपयोगिता प्रमाणपत्राचा संकलित

अहवाल विना विलंब दि. 10 एप्रिल 2015 रोजी सर्व शिक्षा अभियान कार्यालयास सादर करावा.

शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सचिव तथा मुख्याध्यापक, समुह साधन समन्वयक तथा मुख्याध्यापक, शहर साधन केंद्र समन्वयक, साधनव्यक्ति, संबंधित झोनचे शाळा निरिक्षक यांनी 100% उदिष्टपुर्ती करीता कार्य करावे. अहवाल प्राप्तीनंतर ज्या शाळांनी 100% उदिष्टपुर्ती केलेली नाही अश्या शाळेतील मुख्याध्यापक, समुह साधन समन्वयक तथा मुख्याध्यापक, शहर साधन केंद्र समन्वयक, साधनव्यक्ति, संबंधित झोनचे शाळा निरिक्षक यांचेवर जवाबदारी निश्चित करून वरिष्ठांचे निर्देशानूसार प्रशासकिय कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी : सविनय माहितीस्तव सादर :–**

1. मा. राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प., मुंबई
2. मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर

**प्रत** : कार्यवाहीस्तव सादर :–

3. सर्व शाळा निरिक्षक, झोन क्र. 1 ते 10, मनपा. नागपूर
4. सर्व शहर साधन समन्वयक, केंद्र क्र. ......... मनपा. नागपूर
5. सर्व साधनव्यक्ति, मनपा. नागपूर

–sd.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका नागपूर**